# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर–01 (म.रा.)

दु. क्र. ९४२०१८३०१५ ई-मेल : lemafsu@gmail.com

जा. क्र. मपमविवि/निशि/वि.प्र.फेरी/ ५६८ /२१ दिनांक. १२/१०/२०२१

## विशेष व व्यवस्थापन प्रवेशफेरी (Special & Management Round) सुचना परिपत्रक

''पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन'' पदविका अभ्यासक्रमाच्या ज्या पदविका विद्यालयामध्ये अंतिम फेरीनंतर प्रथम वर्षात रिक्त जागा राहिल्या असतील, त्या जागांवर गरजु विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याच्या उद्देशाने विद्यापीठाद्वारे एक विशेष बाब म्हणुन प्रवेशइच्छुक अर्जदारास प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रवेश फक्त गुणवत्तेच्या आधारावर रिक्त असलेल्या व व्यस्थापन कोट्यातील जागाकरिता राहील. प्रवेशाबाबत संकेतस्थळावरून संपुर्ण माहिती जाणुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. त्याकरिता प्रवेशइच्छुक अर्जदाराने खालील सुचना/बाबी विचारात घ्याव्यात.

१. ज्या उमेदवाराने यापुर्वी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहे, परंतु पात्रता असतांना काही कारणास्तव प्रवेश अर्ज रद्द झालेले आहे किंवा अर्जदाराने प्रवेश नाकारला आहे किंवा प्रवेश मिळाला नाही अशा उमेदवारांनी त्यांचे लॉगीन आयडीमधुन अपुर्ण असलेल्या अर्जाची/कागदपत्रांची पुर्तता करून अर्ज फेरसादर करावा.

२. ज्या उमेदवारांनी यापुर्वी ऑनलाईन अर्ज दाखल केला नाही, अश्या उमेदवारांनी माहिती पुस्तिका २०२१-२२ मधील संपुर्ण सुचना वाचुन, नव्याने ऑनलाईन शुल्क व प्रवेशअर्ज सादर करावा.

३. सादर केलेला अर्ज शुल्क व प्रवेशअर्ज तपासणीत तात्पूरता अपात्र (Reject) झाल्यास, अर्जदाराने निर्धारीत तारखेला तक्रारशुल्क (Grievance Fee) भरून, आपले अर्जात त्रुटींची पुर्तता/सुधारणा करण्याकरिता घटक महाविद्यालयात तक्रार समितीपुढे हजर राहुन आपला अर्ज फेरसादर करणे आवश्यक राहील.

४. वरिलपैकी ज्या उमेदवारांना, अर्ज ग्राहय झाल्याचा एस.एम.एस. येईल, त्याच उमेदवारांनी निश्चित दिनांक व वेळेस (दुपारी १२.०० पुर्वी) आपल्या ईच्छेच्या व जागा रिक्त असलेल्या पदविका विद्यालयामध्ये हजर राहणे आवश्यक आहे.

५. पदविका विद्यालयाच्या प्राचार्यांनी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेवर हजर असलेल्या उमेदवारांचे शुल्क व मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी करूनच सामान्य गुणवत्ता यादी तयार करावी. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना गुणवत्तेनुसारच रिक्त असलेल्या जागेवर प्रवेश दयावा.

६. अर्जदाराच्या लॉगीनमध्ये निर्धारीत दिनांकाला ओ.टी.पी दिल्या जाईल. प्राचार्याने सदर ओ.टी.पी घेऊन विद्यालयाच्या लॉगीनमध्ये भरून प्रवेश निश्चित करावा. त्यानंतर विद्यालयाच्या लॉगीनमध्ये प्रोव्हीजनल प्रवेशपत्र उपलब्ध होईल.

७. प्रत्यक्ष प्रवेश घ्यायच्या वेळेवर उपस्थित झाले नाही किंवा रिक्त जागा भरल्या गेल्यास अर्जदारास प्रवेश मिळणार नाही. अर्जदार प्रवेशाच्या वेळेस मुळ प्रमाणपत्रे सादर करू शकला नाही किंवा अर्जातील माहिती/प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनात आल्यास कोणत्याही वेळेस प्रवेश रद्द केला जाईल.

## विशेष व व्यवस्थापन प्रवेश फेरीचे वेळापत्रक (Special & Management Round)

| अ. क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रवेशाकरिता लॉगीन करून शुल्क व अर्ज सादर करणे किंवा सुधारणा/ दुरूस्ती करून फेरसादर करणे. | १२/१०/२०२१ ते २०/१०/२०२१ |
| २ | प्रवेशअर्ज/प्रमाणपत्रे व शुल्क तपासणे. | १२/१०/२०२१ ते २१/१०/२०२१ |
| ३ | प्रवेश अर्ज सुधारणेकरिता घटक महाविद्यालयात जावुन तक्रारशुल्क (Grievance Fee) भरून अर्ज फेरसादर करणे. | २१/१०/२०२१ ते २३/१०/२०२१ सकाळी १०:०० ते सायं. ०६:०० पर्यंत |
| ४ | अर्जदाराने प्रत्यक्ष पदविका विद्यालयामध्ये दु. १२.०० पूर्वी हजर राहणे, प्राचार्याने प्रवेशाकरीत पात्र झालेल्या उमेदवाराची, गुणवत्तायादी तयार करणे, ओ.टी.पी. घेऊन प्रवेश गुणवत्तेनुसार निश्चित करणे. प्रवेशीत विद्यार्थ्याला प्रोव्हिजनल प्रवेशपत्र देणे. | २६/१०/२०२१ दुपारी ११.०० ते सायं. ०६:०० पर्यंत |
| ५ | व्यवस्थापन कोटयाकरिता पदविका विद्यालयात जाऊन प्रवेश पुष्टीकरण करणे व विहीत शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह प्रवेश घेणे | २७/१०/२०२१ |

पदविका विद्यालयांना सुचित करण्यात येते की, जास्तीचे शिकवणी वर्ग आयोजीत करून सदर विशेष व व्यवस्थापन प्रवेश फेरीत प्रवेशित विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करावा.

स्वा-
अधिष्ठाता (नि.शि.)
मपमविवि, नागपुर

Folder-२१, Online Admission-२०२१

Scanned by CamScanner